विधानसभा निवडणूकीच्या अनुषंगाने
अधिकाऱ्यांच्या बदल्या/पदस्थापना.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन आदेश क्रमांक मावज २०१९/प्र.क्र.१६२ /३४-अ
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक ,
मंत्रालय मुंबई-४०० ०३२
दिनांक १७ सप्टेंबर , २०१९

आदेश

आगामी विधानसभा निवडणूकांच्या अनुषंगाने निवडणूकीच्या कामाशी प्रत्यक्षपणे संबधित असणाऱ्या अधिकाऱ्यापैकी स्वत:च्या जिल्हयात कार्यरत असणाऱ्या अथवा दि.३१.१०.२०१९ पूर्वी एकाच जिल्हयात ३ वर्षे पूर्ण करणाऱ्या अथवा मागील ४ वर्षे एकाच जिल्हयात असणाऱ्या अधिकाऱ्यांची ते ज्या जिल्हयात कार्यरत आहेत तेथून अन्यत्र बदली करण्यात यावी असे निदेश भारत निवडणूक आयोगाने दिनांक १६.१.२०१९ च्या पत्राने दिले आहेत. सबब, महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील नियम ५ नुसार माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील गट-अ व गट-ब संवर्गातील अधिकाऱ्यांच्या विधानसभा निवडणूक कालावधीपुरत्या बदल्या करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून खाली नमूद केलेल्या अधिकाऱ्यांची कामकाजाच्या व प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे पदस्थापना करण्यात येत आहे.

अ.क्र.	पात्र अधिकाऱ्याचे नांव व पदनाम आणि ठिकाण	निवडणूकीच्या कालावधीतील पदस्थापना	निवडणूकीचे काम संपल्यानंतरची पदस्थापना
१	२	३	४
१	श्रीमती मनिषा प्रभाकर सावळे, जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, वर्धा	जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, भंडारा	जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, वर्धा
२	श्री. रवि बापूराव गिते, जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, भंडारा	जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, वर्धा	जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, भंडारा
३	श्री. सुनिल अभिमन्यु सोनटक्के, जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय,लातूर	जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, सोलापूर	जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय,लातूर
४	श्री.अरुण पंडितराव सुर्यवंशी, जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय,हिंगोली	जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, उस्मानाबाद	जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय,हिंगोली
५	श्री. रविंद्र पांडुरंग राऊत, जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, सोलापूर	जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, हिंगोली	जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, सोलापूर
६	श्री. मनोज शिवाजी सानप, जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, उस्मानाबाद	जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, लातूर	जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, उस्मानाबाद

२. वरील अधिकाऱ्यांना बदलीच्या पदावर रुजू होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करण्यात येत आहे. सदर अधिकाऱ्यांनी इतर कोणत्याही आदेशाची प्रतिक्षा न करता हेच कार्यमुक्तीचे आदेश समजून त्याच्या नावासमोर दर्शविलेल्या पदावर तात्काळ रुजू होऊन आवश्यक अहवाल सर्व संबंधित कार्यालयांस तसेच शासनास विनाविलंब सादर करावा. हे आदेश तात्काळ अंमलात येतील . बदली झालेल्या अधिकाऱ्यांची बदलीनंतरच्या पदस्थापनेत बदल करण्यासंबंधीच्या कोणत्याही विनंतीची दखल घेण्यात येणार नाही. व त्या संदर्भात कोणत्याही प्रकारे दबाव आणल्यास संबंधित अधिकाऱ्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ अन्वये शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

३. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९१७१६२२१११७०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Ramkisan Narayanrao Musale

Digitally signed by Ramkisan Narayanrao Musale
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e28f6332f6edfebdfb055bf154f99ec0b0d9e613209e20e7a215f026da6875ae, cn=Ramkisan Narayanrao Musale
Date: 2019.09.17 16:33:14 +05'30'

(रा. ना. मुसळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई,
२. मा. राज्यमंत्री (मा.व ज.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. सचिव (मावज) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
४. उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
५. महालेखापाल, महाराष्ट्र -१ (लेखा व अनुज्ञेयता),मुंबई, नागपूर
६. महालेखापाल, महाराष्ट्र -१ (लेखा व अनुज्ञेयता),मुंबई, नागपूर
७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
८. संचालक (माहिती) (प्रशासन) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
९. संचालक (माहिती) (वृत्त व जनसंपर्क), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
१०. संचालक (माहिती) नागपूर अमरावती विभाग, नागपूर,
११.संचालक (माहिती) मराठवाडा विभाग, औरंगाबाद
१२.सर्व विभागीय उपसंचालक (माहिती), कोकण, कोल्हापूर , पूणे, नाशिक, लातूर , अमरावती,
१३. उप संचालक (लेखा), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
१४. जिल्हाधिकारी, लातूर, उस्मानाबाद, हिंगोली, सोलापूर, वर्धा, भंडारा.
१५.जिल्हा माहिती अधिकारी , वर्धा , नागपूर,भडारा, लातूर सोलापूर ,हिंगोली, उस्मानाबाद
१६.जिल्हा कोषागार अधिकारी, वर्धा , नागपूर,भडारा, लातूर सोलापूर ,हिंगोली, उस्मानाबाद
१७.संबंधीत अधिकारी (मावज) मार्फत
१८. सामान्य प्रशासन विभाग /३३/३४
१९. निवड नस्ती.